# **कमळ...**

आज मी तुम्हाला  “निलंबो नुसिफेरा..” ह्या फुलाबद्दल माहिती सांगणार आहे.. नाही ना ऐकलत हे नांव?  पण फूल आपल्याला नक्की माहीत आहे ..  निलंबो नुसिफेरा हे शास्त्रीय नांव असलेलं फूल म्हणजे आपलं “कमळ” !



मी लहान असतांना, पाटी पेन्सिल वापरायला लागले, तेव्हा वडिलांनी मला कमळाचे चित्र कसे काढायचे ते शिकवले होते. मी ते पाटीवर काढून, छान काढतां आलं, म्हणून, शेजारी सगळ्यांना दाखवत हिंडले होते, म्हणे ....ही कमळाची माझी पहिली ओळख..

नंतर शाळेत गेल्यावर “क” क रे कमळातला किंवा बालभारतीच्या पुस्तकात.. “छगन कमळ बघ” हे शिकत असतांना कमळाची परत ओळख झाली.

मग दसऱ्याला विद्येची देवी, सरस्वती, हिच्या फोटोला वंदन करतांना नव्यानी ओळख झाली, कारण काही फोटोंमध्ये सरस्वती कमळात बसलेली आहे, किंवा काही फोटोंत ती, नदीजवळ एका दगडावर, हातात वीणा घेऊन बसली आहे, तिच्या पायाजवळ, मागे, नदीत, कमळं उमललेली आहेत.

शाळेत एक संस्कृत श्लोक होता. बाईंनी तो वर्गात इतक्या सुंदर पध्दतीने शिकवला होता! त्यातले कमळ, पाकळ्यांचे सौंदर्य, नाजूकपणा, त्यावर भाळलेला, गुंग होऊन मध खाणारा भुंगा, सूर्यास्त झाल्यावर कमळं मिटतं, आणि भुंगा आतच अडकतो. लाकडाला पोखरणारा भुंगा, कमळ पोखरून सहज बाहेर येऊ शकला असता, पण भुंगा नाजूक पाकळ्या खराब होतील म्हणून रात्रभर तसाच आत अडकून रहातो. सूर्योदय झाला की पाकळ्या उमलतात, तेव्हा बाहेर पडू असा विचार त्यांने केला. पण सकाळी हत्ती येऊन कमळं उपटतात, आणि ते कमळ मग उमलतंच नाही... आणि भुंगा मरून जातो....

हे सर्व नजरेसमोर आले होते.

रात्रिर्गमिष्यति भविष्यति सुप्रभातं
भास्वानुदेष्यति हसिष्यति पंकजश्री:।
इत्थं विचिन्तयति कोशाचे द्विरेफे
हा हन्त हन्त नंदिनींगज उज्जहार।।

ह्याच अर्थाचे प्रसिध्द गाणेही आहे...
घेई छंद मकरंद
प्रिय हा मिलिंद
मधुसेवनानन्द
स्वच्छंद हा धुंद
मिटतां कमलदल
होई बंदी भृंग
परि सोडिना ध्यास

शाळेत नेहमी टिळक पुण्यतिथीला टिळकांवर भाषण असायचे. त्याची सुरवात नेहमी अशीच असायची ...चिखलात जसे सुंदर कमळ उगवते, तसे रत्नागिरीतील चिखलगांव गावांत एक कमळ उगवले आणि ते म्हणजे लोकमान्य  बाळ गंगाधर टिळक.
कमळ सुंदर असते आणि ते चिखलात उगवते हे तेव्हापासूनच माहीत होते.



मी काढलेली काही कमळाची चित्र

हे सर्व एव्हढ्यासाठी सांगितले की कमळ मला माहीत आहे अशी माझी समजूत होती.

एकदा काही तज्ञ व्यक्तींबरोबर आणि वनस्पतीच्या अभ्यासासाठी एका बागेत आम्ही काहीजणं गेलो होतो. तिथे एका तलावात खूप छान फुलं होती. तज्ञांनी सगळ्यांना विचारले
“हे फूल कसले?” .. सगळे एक जात कोरसमध्ये ओरडले.. “कमळ”.
तज्ञ ताबडतोब म्हणाले ... “चूक”
मला धक्काच बसला ऐकून .. लहानपणापासून इतक्या गोष्टी मला माहीत आहेत कमळाबद्दल .. ते मी ओळखणार कसं नाही?

पण ते म्हणाले .. हे फूल कमळासारखं दिसतं, पण हे कमळ नाही. ह्याचं नांव कुमुदिनी.. water lily. आपण नेहमी पहातो आणि ह्या कुमुदिनीलाच कमळ समजतो. मग माझ्या लक्षात आलं की मी अजून खरं कमळ पाहिलंच नाही.
नंतर अलिबागला ट्रि ला गेले असतांना तिथल्या देवळात मला खरे कमळ दिसले. आणि ते पाहून मी तृप्त झाले. मग मला कळला कमळ आणि कुमुदिनीतला फरक.



पानं, देठ ह्यात मुख्य फरक असतो.
कमळाची पानं पाण्याबाहेर असतात. ६० ते ९० सेंमी.व्यासाची गोल पाने, चकचकीत, खूप सुंदर दिसतात. एखाद्या छत्री सारखी, ढालीसारखीही पाने पाण्यापासून लांब २/३ फूट असतात. पानांवर मेणाचा थर असतो, त्यामुळे पानांवर पाणी रहात नाही. कमळाचे लालसर नारिंगी छटा असणारे देठ

पानाच्या मधोमध असते, आणि प्रकाश किरणांप्रमाणे मध्यापासून पानांच्या कडांपर्यंत पानाच्या शिरा गलेल्या असतात. त्यामुळे ते अतिशय छान दिसते. फूल मोठे आणि १५/२० सेंटिमिटर व्यासाचे असते. फुलाच्या मध्यभागी पिवळ्या रंगाचा फुगीर भाग असतो.

फूल ३ दिवस टिकते. ते सूर्यमुखी आहे. दिवसा सूर्याबरोबर उमलते. ३ दिवसांनंतर फुलाच्या पाकळ्या पडतात, फुलाच्या जागी प्रथम हिरव्या आकाराच्या, टपोऱ्या दाण्यासारख्या बिया येतात. मग त्या काळपट होतात. त्याला कमलगठ्ठा किंवा मणी म्हणतात. ते जपाच्या माळेसाठी वापरले जातात. कमळाच्या फळांना मखना म्हणतात. कमळाच्या बिया खूप वर्ष टिकतात. अगदी १०० वर्षांनंतरही रूजतात.

कुमुदिनीची फुले थोडी लहान असतात. पानं पाण्यावर तरंगतात. ती ओली होतात. ती जातीप्रमाणे वेगवेगळ्या रंगाची असतात. फुलं पण अनेक रंगांत असतात. ती २ आठवडे टिकतात.

पान v मध्ये विभागलेले असते. मधे फाटलेले असते तिथे देठाला जोडलेले असते. फुलाच्या ठिकाणी पाकळ्या पडल्यावर असंख्य, मोहरीच्या आकाराच्या बिया येतात.

कमळाचे मूळ स्थान भारत, चीन, जपान असावे. हिमालय ते श्रीलंका, इथे सर्वत्र, गोड आणि उथळ पाण्यात कमळ आढळते.
भारताचे आणि व्हिएतनामचे ते राष्ट्रीय फूल आहे. मार्च ते ऑक्टोबर या मोसमात ती जास्त असतातं. कारण जास्त सूर्यप्रकाश या झाडांना लागतो. फुलांचा मंद सुगंध, आकर्षक रंग व आकार ह्यामुळे कीटक आकर्षित होतात. भुंग्यामुळे पराग सिंचन होते.

कमळ हे अतिशय पवित्र मानले जाते. भगवान विष्णुच्या नाभीतून कमळाची उत्पत्ती झाली असे म्हणतात. ते विष्णुच्या हातात असते, तर ब्रह्मदेवाचे कमळ हे आसन असते. शंकरांची उपासना करतांना विष्णुनी, रोजच्या पेक्षा १ कमळ कमी होते म्हणून, आपले नेत्रकमल, आणि रावणानी शिरकमल, अर्पण केले असे उल्लेख पुराणात सांपडतात.

देवांच्या अवयवांचे, पदकमल, नेत्रकमल, करकमल, मुखकमल, नाभिकमल, ह्दयकमल, शिरकमल असे उल्लेख आढळतात.
पुराणात कमळाची ३२ नांवे सापडतात असे वाचनांत आले.
२४ पाकळ्यांचे कमळ, १०८ पाकळ्यांचे कमळ असे दोन प्रकार कमळामध्ये आहेत, असा उल्लेख आहे.
ज्ञानेश्वरांनी शतदल, सहस्त्रदल असा कमळाचा उल्लेख केला आहे.



चक्रवाक या छोट्या सोनेरी रंगाच्या पक्ष्याचा एक उल्लेख वाचनात आला होता. हे पक्षी पाण्याच्या जवळपास रहातात. जलवनस्पती हे त्यांचे खाद्य. दिवसभर जोडीने हिंडतात. पण कवीकल्पना सांगते, काळोख झाल्यावर ते बिछडतात. कमळाच्या एकाच वेलीवर ते रात्रभर असतात. पण मध्ये कमळाचे मोठे गोल पान असते. त्यामुळे ते एकमेकांना दिसत नाहीत. सूर्योदयानंतर ते एकमेकांना दिसतात. आणि एकत्र परत उडतात.

कमळाला पाहून चक्रवाक पक्षी आनंदानी ओरडतात, असे म्हणतात.

कमळाला धार्मिक आणि अध्यात्मिक महत्व आहे.

कमळ हे परम तत्वाचं प्रतीक आहे .

कमळ जसं चिखलांत उगवूनही, उंच राहून, सुंदर फुलून, आपल्या अंगाला चिखल लागू देत नाही, आणि जगाला आनंद देते, तसे संसारातल्या दु:ख, वाईट प्रवृत्ती, कष्ट ह्यात राहूनही, आपण त्यातून अलिप्त राहून, संसाराच्या दोषापासून मुक्त रहायला शिकायला पाहिजे, ही जीवनदृष्टी कमळ शिकवते. ह्रदय आणि मनाच्या शुध्दतेचे ते प्रतीक आहे. समृध्दी, मनाची ताकद, अनासक्ती, दीर्घ आयुष्य ह्याचे ते प्रतीक आहे .

कमळाला वेगवेगळी नांवं आहेत आणि रंगाप्रमाणे वेगवेगळी प्रतिकं समजली जातात.

सरोज, नलिन, पद्म, पंकज, अरविंद, राजीव, अंबुज, मकरंद, पुष्कर, सारस ही त्यातली काही ओळखीची नांवं.



लाल कमळ .. कोकनद... खऱ्या प्रेमाचे प्रतीक,
पांढरे कमळ... पुंडलिक... शुध्दतेचे प्रतीक,
गुलाबी.. पूर्णत्वासाठी, ज्ञानाचे प्रतीक आहे, बुध्दाचे आणि कमळाचे जवळचे नाते आहे.
निळे कमळ ... इंदीवर ..शहाणपणाचे, हुशारीचे प्रतीक आहे.
योगसाधनेतही कमळाला खूप महत्व आहे.

सहस्त्र पाकळ्यांचे कमळ



चक्र साधनेत, शेवटचे चक्र सहस्त्रधारा मध्ये १००० पाकळ्यांचे जांभळे कमळ नजरेसमोर आणायचे असते. मुद्रांमध्येही पद्‌ममुद्रा असते, जी अनाहत चक्राला चालना देते. ज्याच्यामुळे, प्रेम, कृतज्ञता, संवेदनशीलता वाढते.

कमळ हे समृध्दीचे, विजयाचे प्रतीक आहे. मंडल कलाकृतीत ते आढळते. गड, किल्ले, मंदिरं, लेणी, रांगोळी सर्व ठिकाणी आपण मांगल्याचे प्रतीक म्हणून कमळ पहातो.

**..... चित्रा मेहेंदळे**